# नियमित दिवाणी मुकदमा नं. २८/२०१४
# निशाणी ८० वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज त्रयस्थ अर्जदार अशोक शांताराम यादव यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता क्र.६ नियम १७ अन्वये दाखल करणेत आलेला आहे.

२. अर्जदार यांच्या मते, सदरहू दाव्यातील वादी शांताराम मनोहर यादव हे दिनांक २८/०२/२०२३ रोजी आरवली येथे मयत झाले. सदरहू वादी यांनी अर्जात नमूद कायदेशीर वारस आहेत. व या वारसां व्यतिरीक्त अन्य कोणीही वारस नाहीत. सबब,शांताराम मनोहर यादव यांचे कायदेशीर वारस दाव्याचे कामी सामिल करण्याकरिता अर्जदार यांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे. अर्जदार पुढे कथन करतात की, वादी श्री.मनोहर शांताराम यादव यांचे नमूद कायदेशीर वारस दाव्यामधील वादी स्वरुपात सामिल करण्यास व तशी परवानगी मिळण्यासाठी अर्जदार यांनी सदरचा अर्ज केला आहे.

३. वादी श्री. शांताराम मनोहर यादव (मयत),कायदेशीर वारस– १अ)श्रीम. सत्यशिला शांताराम यादव (पत्नी), वय सु.६२ वर्षे, धंदा– गृहिणी,१ब) श्री.अशोक शांताराम यादव (मुलगा), वय सु.४५ वर्षे, धंदा– खाजगी नोकरी, १क) श्रीम. प्रतिभा शांताराम यादव (मुलगी), वय सु.४३ वर्षे, धंदा–गृहिणी, १ड)श्री. प्रसाद शांताराम यादव (मुलगा), वय सु.४१ वर्षे, धंदा– खाजगी नोकरी, सर्व राह. आरवली, गावधडवाडी, ता. वेंगुर्ला, जि. सिंधुदुर्ग.

४. प्रस्तुत अर्जावर प्रतिवादी यांनी विरोध दर्शवून सदर अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली.

५.        सदर अर्जाचे स्वरुप व दाव्याचे स्वरुप पाहता वादी यांचे कायदेशीर वारस क्र.१अ ते १ड यांना दाव्याचे कामी प्रतिवादी सदरात सामील केल्यास दाव्याचे कोणतेही स्वरूप बदलणारे नाही. प्रतिवादी यांचे कायदेशीर वारस क्र.१अ ते १ड हे कायदेशीर प्रतिनिधी असल्यामुळे त्यांना वादी सदरात सामील करण्यात यावे.

५.        प्रस्तुतकामी अर्जदार यांनी अर्जात नमूद केलेली मागणी ही फॉर्मल स्वरुपाची आहे. सदर मागणी मंजूर केल्यास त्याचा दाव्याच्या गुणदोषावर कोणताही परिणाम होणार नाही. सबब, मी न्यायाचे कारणास्तव पुढील आदेश पारीत करत आहे.

**आदेश**

**१.** अर्ज मंजूर करणेत येत आहे.

**२.** अर्जदार यांनी सदर आदेशापासून १४ दिवसांचे आत दुरुस्ती करणेची असून पुढील नेमले तारीखेपर्यंत दुरुस्ती प्रत सादर करणेची आहे.

सही/-

( डी.वाय.रायरीकर)

दिनांकः–१०/०१/२०२४.        सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),वेंगुर्ला.